**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**सार्वजनिक आरोग्य खाते**
**क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी-15.**
**काआअ/3807/क्षरुस(वआ)दि.18.07.2025.**

## जाहिरात

क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी येथे विषेषज्ञ वैद्यकिय सल्लागार 12 पदे, अतिदक्षतातज्ञ 4 पदे, कंत्राटी वैद्यकिय अधिकारी 22 पदे, कंत्राटी वैद्यकिय अधिकारी (MO-IRCU) 4 पदे, व फिजिओथेरपिस्ट 1 पद हि पदे निव्वळ कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी खाली नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हता, अनुभव व मासिक ठोस वेतन अन्वये अर्ज मागवण्यात येत आहेत.

**पदाचा कार्यकाल: दि.१६.०८.२०२५ ते दि.३१.०३.२०२७**
**(कंत्राटी तत्वावर दर १७९ दिवसांनी १ दिवसाचा तांत्रिक खंड)**

| अनु.क्र | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक अर्हता- | मासिक ठोस वेतन |
|---|---|---|---|---|
| 1 | **विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार- (SMC)**<br>**छातीविकारशास्त्र तज्ञ (Respiratory medicine / Chest & TB) – 5 पदे**<br><br>**मनोरोग शास्त्र तज्ञ (Psychiatry) – 4 पदे**<br><br>**बालरोग तज्ञ (Pediatric) – 1 पद**<br><br>**सुक्ष्मजीवशास्त्र तज्ञ (Microbiologist) – 1 पद**<br><br>**भुलरोग तज्ञ (Anesthesia) – 1 पद** | **12** | संबंधित विषयामध्ये मान्यताप्राप्त विद्यापिठाची M.D./DNB पदवी (PG Degree) किंवा पदविका(PG Diploma) असावी. | रु. 1,00,000/- प्रति महिना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | **अतिदक्षतातज्ञ (INTENSIVIST)** | **4** | वैद्यक शास्त्रातील (General Medicine) तसेच छातीविकारशास्त्र(Respiratory Medicine/ Chest & TB), भुलरोगशास्त्र (Anesthesia), अतिदक्षता/ आपात्कालीन वैद्यकशास्त्र (Critical Care/Emergency Medicine) या विषयातील M.D./DNB पदवी (PG Degree) किंवा पदविका(PG Diploma) असावी.<br>वैद्यकशास्त्रातील पदवी( MD/DNB-General Medicine) असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>पदव्युत्तर पदवीकाधारक (PG Diploma)उमेदवाराकडे अतिदक्षता विभागात किमान 12 महिने काम केल्याचा अनुभव आवश्यक. | PG Diploma /PG Degree- 1 वर्षापेक्षा कमी अनुभव रु. 1,25,000/-<br><br>PG Degree- 1 ते 5 वर्ष अनुभव रु. 1,35,000/-<br><br>PG Degree- 3 ते 8 वर्ष अनुभव रु. 1,50,000/-<br><br>PG Degree- 8 वर्ष पेक्षा जास्त अनुभव रु. 2,00,000/- |
| 3 | **वैद्यकीय अधिकारी** | **22** | मान्यताप्राप्त विद्यापिठाची ''एम.बी.बी.एस.'' पदवी | रु. 90,000/- प्रति महिना |
| 4 | **वैद्यकीय अधिकारी (MO-IRCU)** | **4** | मान्यताप्राप्त विद्यापिठाची ''एम.बी.बी.एस.'' पदवी<br>अतिदक्षता विभागात काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य | रु. 90,000/- प्रति महिना |
| 5 | **फिजिओथेरपिस्ट** | **1** | मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी किंवा पदविका(PG Diploma) असावी.<br>MPT/BPT or equivalent | रु. 25,000/- प्रति महिना |

★ **महत्त्वाच्या सूचना:**

1 ) क्षयरोग रुग्णांचा उपचार करण्याचा अनुभव असलेल्या उमेदवाराला प्राधान्य दिले जाईल.

2) उपरोल्लिखित अनुभव धारण केलेले उमेदवार उपलब्ध न झाल्यास अपवादात्मक स्थितीमध्ये क्षयरोग रुग्णालय येथिल रुग्ण सेवा सुरळीत चालविण्यासाठी अनुभवाची अट शिथील करण्यात येईल.

**अर्जप्रक्रिया :**

१) अर्जदाराने आपले अर्ज प्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रतीसहीत **<u>दि.25.07.2025 ते दि.04.08.2025</u>** पर्यंत सोमवार ते शुक्रवार (सार्वजनिक सुट्ट्या वगळून) रूग्णालयाच्या कार्यालयात सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावे.

२) अर्जदाराने कार्यालयातून चलन घेऊन अर्जदाराने अर्जाचे शुल्क रू.७९०/- + १८% GST महानगरपालिकेच्या एफ साउथ, परळ येथिल नागरी सुविधा केंद्रात (CFC) रोखीत भरावे व शुल्क

भरल्याची पावती विहीत कालावधीत सादर करावी.

**प्रमाणपत्रे** :

१) पदवी, पदवृत्तर पदवी व इतर शैक्षणिक प्रमाणपत्र व उत्तीर्ण गुणपत्रीका
२) वैध एमएमसी नोंदणी प्रमाणपत्र, अतिरिक्त पात्रता नोंदणी प्रमाणपत्र व नुतनीकरण प्रमाणपत्र
३) अनुभव प्रमाणपत्र
४) आधार कार्ड आणि पॅन कार्डची प्रत
५) छायाचित्र (Photo of candidate)

**सर्व साधारण अटी व शर्ती:-**

1) उमेदवारांकडे महाराष्ट्र वैद्यकीय परीषद यांची मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी / पदवीका (PG Degree/PG Diploma) तसेच त्यांचे नोंदणीकरण व नोंदणीकरणाचे नुतनीकरण बंधनकारक आहे.
2) उमेदवारास संगणकाचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक आहे व गरज पडल्यास M.S.C.I.T. अथवा तत्सम प्रमाणपत्र परिक्षा विहित कालावधीत उतिर्ण करणे आवश्यक असेल.
3) **उमे**दवारांची सदर पदावरिल नियुक्ती भविष्यात कोणत्याही परिस्थितीमध्ये नियमित करण्यात येणार नाही.
4) उमेदवारांची कंत्राटी तत्वावरची नियुक्ती आवश्यकता नसल्यास कुठल्याही क्षणी संपुष्टात आणण्यात येईल.
5) उमेदवारांची कंत्राटी तत्वावरची नियुक्ती ही नियमित तत्वावरिल नियुक्तीकरिता ग्राहय धरण्यात येणार नाही.
6) उमेदवारांच्या नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी पदधारकाने चुकीची माहीती प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहीती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती रद्दबातल करण्यात येईल.
7) नियुक्तीच्या वेळी 500 रुपयांच्या बॉन्ड पेपरावर विहित नमुन्यातील कंत्राट करार करुन संबंधीत आस्थापनेस 15 दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक राहील अन्यथा त्याची नियुक्ती रद्दबातल करण्यात येईल.
8) उमेदवाराच्या कंत्राटी तत्वावरिल नेमणूकीनंतर त्रैमासिक अनुपालन अहवाल (Performance Report) जसे की दैनंदीन उपस्थिती, दिलेल्या सेवेचा संख्यात्मक व गुणात्मक अहवाल यानुसार कंत्राटी सेवा पुढे चालू ठेवण्यात येईल.
9) सदर कंत्राटी तत्वावरिल पदधारकाने नियुक्ती कालावधीत शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.
10) नियुक्त उमेदवारांला कुठल्याही कारणास्तव पदाचा राजीनामा दयावयाचा असल्यास त्याने एक महिना आधी पुर्वसूचना देणे बंधनकारक राहिल.

11) पदधारकाला सदर पदाचे आदेश प्राप्त झाल्यावर सात दिवसाच्या आत त्वरित कर्तव्यार्थ हजर राहाणे बंधनकारक राहिल अन्यथा सदर पदाच्या नियुक्तीकरिता आपणास स्वारस्य नसल्याचे समजून पुढिल उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल.

12) वैद्यकिय अधिक्षक व प्रमुख वैद्यकिय अधिकारी यांना गरजेनुसार उमेदवारांच्या कर्तव्य व जबाबदा-या निर्धारित करण्याचे व त्यात वेळोवेळी सुधारणा करण्याचे पुर्ण अधिकार असतील व उमेदवाराला त्या प्रमाणे सेवा देणे बंधनकारक असेल.

13) परिपत्रक क्र. संचालक वै.शि. व प्र.रु. /2335 दि.25.07.2022 नुसार दि.04.07.2022 पासून एका वर्षात 15 नैमित्तिक रजा अनुज्ञेय असतील, त्या अनुषंगाने सहा महिन्यांकरिता यथाप्रमाणे 7 ½ नैमित्तिक रजा मिळू शकतील.

14) सदर निवड प्रक्रिया Walk in Inrerview पद्धतीने क्षयरोग रुग्णालय समूह रुग्णालयाच्या प्रशासकीय कार्यालयामार्फत करण्यात येयील.

15) सदर उमेदवारांची भरती 16.08.2025 ते 31.03.2027 या कालावधीसाठी असेल.

16) उमेदवारांची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात प्रथम 179 दिवसांसाठी करिता असेल तसेच जर उमेदवारांचे काम समाधानकारक असेल तर कंत्राटी तत्वावर एक दिवसांचा तांत्रिक खंड देऊन पुर्न नियुक्ती करण्यात येईल.

17) निवड न झालेल्या पात्र उमेदवारांची प्रतिक्षायादी तयार करुन सदर प्रतिक्षायादी 31/03/2027 पर्यंत ग्राह्य धरण्यात येईल व नियुक्त झालेला कंत्राटी उमेदवारांनी राजीनामा दिल्यास, सेवा सोडुन गेल्यास अथवा विहित वेळेत रुजु न झाल्यास सदर प्रतिक्षायादीमध्ये उपलब्ध असलेल्या पुढील उमेदवारास नियुक्त करण्यास येईल.

18) क्र. एचओ/28275/लेखा. दि. 07.02.2025 (सार्वजनिक आरोग्य खात्याच्या अख्त्यारीतीतील संकीर्ण शुल्बाबत) नुसार अर्जदारांनकडुन 790 + GST अर्ज शुल्क वसुल करण्यात येईल. अर्जदाराने क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी येथिल कार्यालयातून चलन घेऊन अर्जाचे शुल्क रू.७९०/- + १८% GST महानगरपालिकेच्या एफ साउथ, परळ येथिल नागरी सुविधा केंद्रात (CFC) रोखीत भरावे व शुल्क भरल्याची पावती विहीत कालावधीत सादर करावी.

**<u>कर्तव्ये व जबाबदा-या</u> :-**

<u>विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार यांच्या कर्तव्ये व जबाबदा-या</u> :-

1) विशेषज्ञ वैदयकीय सल्लागार (Specialty Medical Consultants) क्षयरोग रुग्णालय प्रमूखांच्या अधिपत्याखाली कर्तव्यार्थ राहतील.

2) विशेषज्ञ वैदयकीय सल्लागार संबधीत युनिटमध्ये पूर्णवेळ (सकाळी ८.०० ते दूपारी ४.००) कार्यरत राहतील व रुग्णसेवेच्या आवश्यकतेनूसार रात्रपाळीतही कार्यरत राहतील. गरज भासल्यास आपातकालीन परिस्थितीत इतर विभागातही रात्रपाळीतही आवश्यक सेवा म्हणून काम करावे लागेल.

3) विशेषज्ञ वैदयकीय सल्लागार (Speciality Medical Consultants) यांची रुग्णसेवेच्या आवश्यकतेनुसार क्षयरोग रुग्णालय अंर्तगत येणा-या इतर क्षयरोग चिकित्सालयात रुग्णसेवा देणे बंधनकारक असेल .

4) विशेषज्ञ वैदयकीय सल्लागार आपातकालीन काळात रुग्ण सेवा देण्यासाठी उपलब्ध असतील.

**अतिदक्षतातज्ञ (Intensivist) डॉक्टर यांची कर्तव्यसूची** :-

1. चक्रांकित पद्धतीने दिवस रात्र पाळीमध्ये अतिदक्षता विभाग (IRCU) सांभाळणे.
2. वैद्यकीय अधिकारी (IRCU) यांना मार्गदर्शन करणे व त्यांच्या कामकाजावर लक्ष ठेवणे.
3. अतिदक्षता विभागात भरती होणा-या रुग्णांची Case History घेणे, दररोज तपासणी करणे व त्यांची Indoor Paper वर नोंद करणे.
4. वैद्यकीय अधिकारी (IRCU) यांच्याकडून अशक्य झालेली कामे पूर्ण करणे.
5. अतिदक्षता विभागातील रुग्णांना Intubation करणे, Bi-PAP मशीन, NIV मास्क लावणे.
6. सर्व रुग्णांची वेळोवेळी Monitoring करणे.
7. गरज भासल्यास बाह्यरुग्ण/आंतररुग्ण विभागात जाऊन तपासणी करणे व आवश्यकता भासल्यास अशा रुग्णांना अतिदक्षता विभाग (IRCU) मध्ये भरती करुन घेणे.
8. IRCU मधील रुग्णांच्या तब्येतीचा गोषवारा विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार (SMC)अतिदक्षता विभाग (IRCU) यांना देणे व त्यांच्यासोबत आंतररुग्ण कक्षामध्ये भेट देणे.
9. अतिदक्षतातज्ञ (Intensivist) यातिल कोणी डॉक्टर्स निर्धारित रजेव्यतिरिक्त अपरिहार्य कारणाने अनुपस्थित असतील तसेच रजा राखीव (Leave Reserve) डॉक्टर्स सुद्धा कमी पडत असतील तर अनुपस्थित डॉक्टरांचे वेतन त्याप्रमाणामध्ये कापून घेण्यात येईल व त्यांच्या जागी काम करणा-या अन्य डॉक्टरांना त्या दिवसाची पूरक रजा (Compensatory off) देण्यात येथील तसेच आळीपाळीने एक साप्ताहीक रजा (weekly off) देण्यात येईल.
10. अतिदक्षतातज्ञ (Intensivist) आपातकालीन काळात रुग्ण सेवा देण्यासाठी व कक्ष तसेच बाह्य रुग्ण विभाग येथे रुग्ण सेवा देण्यासाठी उपलब्ध राहणे बंधनकारक असेल.

**वैद्यकीय अधिकारी यांची कर्तव्यसूची**-

1) चक्रांकित पद्धतीने दिवस व रात्र पाळी करुन बाह्यरुग्ण व आंतररुग्ण विभाग सांभाळणे.
2) बाह्यरुग्ण विभागात येणा-या नविन तसेच जुन्या क्षयरुग्णांचे उपचार करणे व आवश्यक रुग्णांना आंतररुग्ण विभागात भरती करुन घेणे.
3) आतंररुग्ण विभागातील रुग्णांची दैनंदिन तपासणी करणे, रक्ताचे नमुने गोळा करणे, Intavenous canula, Foleys catheter, Ryles Tube टाकणे.
4) आंतररुग्ण विभागातील वैद्यकीय अपात्कालीन कॉल्स जसे की, Haemopstasis, Pneumothorax, Hydropneumothorax, प्रतीकुल औषध प्रतिक्रिया(ADR), श्वसनास त्रास, बेशुद्ध होणे इ. रुग्णांना तपासणे व उपचार करणे.
5) आवश्यक असल्यास अशा रुग्णांना वैद्यकीय महाविद्यालयात पुढील उपचारार्थ स्थलांतरीत करणे.
6) शस्त्रक्रिया विभागात होणा-या ICD Insertion, Reinsertion, Pleural Tapping, Bronchoscopy अशा लघु शल्यक्रिया पार पाडणे किंवा त्यास सहाय्य करणे.

7) शस्त्रक्रिया विभागातील Decortication, Pneumonectomy, Window Surgery अशा दिर्घ शस्त्रक्रिया करण्यास शल्यविशारदांना सहाय्य करणे व शस्त्रक्रियेनंतर रुग्णांची देखभाल करणे.

8) आंतररुग्ण विभागात Pleural tapping, Ascitic tapping करणे.

9) क्षयरोग रुग्णालयांतर्गत कार्यतर असलेले खालील कक्ष सांभळणे.

- HIV ग्रस्त रुग्णांसाठी ART OPD.
- कर्मचारी बाह्यरुग्ण विभाग.
- क्षयरोग पश्चात बाह्यरुग्ण विभाग.
- शल्यचिकित्सा बाह्यरुग्ण विभाग.

10) विशेषज्ञ वैदयकीय सल्लागार व मानसेवी तज्ञ यांच्या सोबत बाह्यरुग्ण, आंतरुग्ण विभागातील रुग्णांची तपासणी करणे.

11) वैद्यकीय महाविद्यालयातुन क्षयरोग रुग्णालयात रुग्णांना स्थलांतरीत करुन घेण्यासाठी समन्वय साधणे व त्यांना आंतररुग्ण विभागात भरती करुन घेणे.

12) विविध प्रकारचे वैद्यकीय प्रमाणपत्र देणे.

13) न्यायवैद्यकीय प्रकरणे हाताळणे व त्यासंदर्भित न्यायालयीन कामकाजाला हजर राहणे.

14) रुग्णालयीन कर्मचा-यांचे वैद्यकीय प्रशिक्षण घेणे.

15) उपरोक्त कामकाजाची विभागणी सेवाजेष्टतेनुसार व प्रशासकीय सोयीनुसार करणे.

**<u>वैद्यकीय अधिकारी- MBBS (MO IRCU) यांची कर्तव्यसूची</u>-**

1. चक्रांकित पद्धतीने दिवस व रात्र पाळीमध्ये अतिदक्षता विभाग (IRCU) सांभाळणे.
2. अतिदक्षता विभाग (IRCU) मधील रुग्णांची दैनंदिन तपासणी करणे, रक्ताचे नमुणे गोळा करणे, Intravenous canula, Foleys catheter, Ryles Tube टाकणे.
3. अतिदक्षता विभाग (IRCU) मधील वैद्यकीय अपात्कालीन कॉल्स जसे Haemoptysis Pneumothorax, Hydropeunmothorax, प्रतिकुल औषध प्रतिक्रिया (ADR), श्वसनास त्रास, बेशुद्ध होणे इत्यादी बघणे व उपचार करणे.
4. अतिदक्षता विभाग (IRCU) मध्ये Pleural, Ascitic tapping करणे.
5. अतिदक्षतातज्ञ (Intensivist) डॉक्टर्स सोबत IRCU विभागातील रुग्णांची तपासणी करणे.
6. अतिदक्षता विभागातील रुग्णांना Intubation करणे, Bi-PAP मशीन,NIV मास्क लावणे व सदर कामकाजासाठी अतिदक्षता तज्ञ यांची मदत व मार्गदर्शन घेणे.
7. सर्व रुग्णांची वेळोवेळी Monitoring करणे.
8. वैद्यकीय महाविद्यालयातून व इतर रुग्णालयांतून क्षयरोग रुग्णालयात रुग्णांना स्थलांतरीत करुन घेण्यासाठी समन्वय साधने व त्यांना आंतरुग्ण विभागात भरती करुन घेणे.

**फिजिओथेरपिस्ट कर्तव्ये व जबाबदा-या :-**

1) आंतररुग्ण व बाह्यारुग्ण विभागात येणा-या क्षयरुग्णांना फुफ्फसिय पुर्नवसन केंद्रसाठी विविध प्रकारच्या श्वास व स्नायुंचे व्यायाम करुन घेणे.
2) विविध माहितीचे संकलन करणे.

SD/-
**वैद्यकिय अधिक्षक**
**क्षयरोग रुगणालय समुह**

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी-15.
**काआअ/ /क्षरुस(वआ) दि. . .2025**

**विषयः-** क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी येथे कंत्राटी वैद्यकिय अधिकारी 22 पदे, विषेषज्ञ वैद्यकिय सल्लागार 12 पदे, कंत्राटी वैद्यकिय अधिकारी (MO-IRCU) 4 पदे, अतिदक्षतातज्ञ 4 पदे व फिसिओथेरपिस्ट 1 पद हि पदे निव्वळ कंत्राटी तत्वावर भण्याबाबत.

**संदर्भः-** 1) महानगरपालिका आयुक्त यांची क्र. एमजीसी/एफ/ 6962 दि. 26.06.2025 अन्वयेची मंजुरी पृष्ठ क्र. 83 ते 99
2) क्र.एचओ/008063/आस्था-1 (अ) दि. 01.07.2025

उपरोक्त विषय व संदर्भान्वये क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी येथे कंत्राटी वैद्यकिय अधिकारी 22 पदे, विषेषज्ञ वैद्यकिय सल्लागार 12 पदे, कंत्राटी वैद्यकिय अधिकारी (MO-IRCU) 4 पदे, अतिदक्षतातज्ञ 4 पदे व फिसिओथेरपिस्ट 1 पद हि पदे निव्वळ कंत्राटी तत्वावर भण्याबाबत.

मा. महानगरपालिका आयुक्त यांची क्र.एमजीसी /एफ/ 6962. दि.26.06.202 अन्वयेची मंजुरी पृ.क्र 83 ते 99 ची मंजुरी प्राप्त झाली आहे. त्या अनुषंगाने वरिल पदांसाठी जाहिरात प्रसारित करण्यात येत आहे.

1. उमेदवारांची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात प्रथम 180 दिवसांसाठी करिता नियुक्ती करण्याकरिता जाहिरात देण्यात येत आहे. जर उमेदवारांचे काम समाधानकारक असेल तर कंत्राटी तत्वावर एक दिवसांचा तांत्रिक खंड देऊन पुर्न नियुक्ती करण्यात येईल.
2. जाहिरातीमध्ये नमूद अर्हता धारण केलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.
3. सदर जाहिरात महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (Portal.mcgm.gov.in) प्रसिध्द करण्यात येत आहे. नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यासाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.
4. सदर उमेदवारांना जाहिरातीमध्ये नमूद केल्या प्रमाणे वेतन देण्यात येईल.
5. सदर उमेदवारांची भरति प्रक्रिया 16.08.2025 पसून ते 31.03.2027 पर्यंत करण्यात येईल
6. प्रत्येक उमेदवारा walk in selection द्वारे भरण्यात येतील.

**वैद्यकिय अधिक्षक**
**क्षयरोग रुगणालय समुह**